# <u>कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३</u>

सावधान ! मुं.मे.रे.कॉ.च्या नावाने दिले जाताय बनावट ‘नियुक्तीपत्र’

▪कंपनीकडून बीकेसी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार
▪केवळ अधिकृत संकेतस्थळाचा आधार घ्यावा – मुं.मे.रे.कॉ

मुंबई, १३ जुलै २०२१ - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) च्या नावाने असामाजिक तत्त्वांनी विविध तांत्रिक आणि प्रशासकीय पदांसाठी बनावट नियुक्ती पत्र आणि प्रशिक्षण रोजगार पत्र बहाल केले आहेत. कंपनी स्पष्ट करते की, अशी कोणत्याही प्रकारची नियुक्तीपत्र कोणालाही देण्यात आलेली नाहीत. अशा नियुक्तीपत्रांना कोणीही बळी पडू नये.
नुकतेच मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या नावाने बनावट पत्र तयार करण्यात आल्याची बाब उजेडात आली आहे. नोकरीस इच्छुक उमेदवारांना ‘नियुक्ती पत्र’व ‘प्रशिक्षण रोजगार पत्र’देऊन पैशाची मागणी करण्यात आली आहे. हा अतिशय गंभीर प्रकार असून उमेदवारांना लुबाडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. याबाबत बीकेसी पोलीस स्थानकास माहिती देण्यात आली असून पोलीस पुढील तपास करीत आहेत.

मुं.मे.रे.कॉ.द्वारे स्पष्टीकरण देण्यात येत आहे की, बनावट नियुक्ती पत्र आणि प्रशिक्षण रोजगार पत्रामध्ये दावा केल्याप्रमाणे संघटनेत कोणत्याही रिक्त जागा नाहीत. मुं.मे.रे.कॉ भरती प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर कोणत्याही उमेदवाराकडून शुल्क मागत नाही. जनतेला विनंती करण्यात येते की, त्यांनी अशा बनावट नियुक्तीपत्रांना बळी पडू नये. भरतीबाबत नियमित माहितीसाठी मुं.मे.रे.कॉचे अधिकृत संकेतस्थळ www.mmrcl.com तपासावे, असे आवाहन मुं.मे.रे.कॉचे व्यवस्थापकीय संचालक श्री. रणजित सिंह देओल यांनी केले आहे.

For further information please contact: -

| | |
|---|---|
| Vaidehi More | Niti Tamse |
| 9028543087 | 8369727364/9664215544 |
| vaidehi.more@mmrcl.com | niti.tamse@mmrcl.com |